दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१७ एप्रिल २०२५


"सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हटल तर तो उद्या कधीच येत नाही".







# नागपूरमधील खळबळजनक घटना !

## मोबाईलवरुन मित्रानेच घेतला मित्राचा जीव...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, नागपूर :** मित्रांमध्ये सुरु असलेली मस्करी एका तरुणाची जीवावर बेतली आहे. मित्रांसमोर थापड मारली याचा राग सहन न झाल्याने मित्राने मित्राचीच लाडकी दांडक्याने मारहाण करत जीव घेतला आहे. नागपूरच्या हिवरी नगर नंदनवन परिसरात ही घटना घडली आहे.

नागपूर येथून पोलीस ठाणे पारडी हद्दीतील नवीन नगर येथे ४० वर्षीय जितेन्द्र उर्फ जितू राजू जयदेव हे आपल्या जुन्या मित्रांना भेटायला आले होते. सहज एकमेकांची खोड काढत असताना त्यांचा मित्र आरोपी ईतवारीदास शिवदास माणिकपूरी याच्यासोबत मोबाईल घेण्यावरून वाद झाला.



यावेळी आरोपीने जितूला म्हटले की, तू माझा मोबाईल लपवला असून आताच्या आता माझा लपवलेला मोबाईल देऊन टाक. यावर जितू याने माझ्याकडे मोबाईल नाही, असे म्हटले. यावरून त्यांच्यात वाद झाला. इतवारीदास समजून घेत नाही, असा विश्वास झाल्याने जितू याने रागात आरोपीला कानाखाली मारली. नेमका याचाच आरोपीला राग आल्याने त्याने थांब, तुला पाहुन घेतो असे म्हणत निघून गेला.

जितू हा तेथील पानटपरीजवळ फुटपाथवर बसलेला असताना आरोपीने लाकडी दांड्याने जितूचे डोक्यावर, पाठीमागे मारहाण करुन गंभीर जखमी केले आणि पळून गेला. पारडी पोलिसांनी मिळालेल्या सूचनेवरून त्वरीत दखल घेत जखमी जितूला जवळी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

याप्रकरणी पारडी पोलिसांनी आरोपीचा त्वरीत शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. पोलीस ठाणे पारडी येथे आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# विशाल गवळीची जेल प्रशासनानं हत्या केली, आईचा आरोप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १६, कल्याण (ठाणे) :** कल्याणमध्ये चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या करणारा नराधम विशाल गवळीनं काही दिवसांपूर्वी तळोजा जेलमध्ये आत्महत्या केली. विशालने जेलमधील शौचालयात टॉवेलच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याचे आढळून आले होते. विशालनं आत्महत्या केली नाही त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले किंवा जेल प्रशासनानं त्याची हत्या केली असा आरोप त्याच्या आईनं केला आहे.

विशालनं गळफास घेतला नाही. त्याला पोलिसांनी फाशी दिली. त्याला जेलमध्ये त्रास दिला जात होता, असा आरोप विशालची आई इंदिरा गवळीनं केला आहे. तर, विशालच्याा आई-वडिलांना त्यानं आत्महत्या केली नाही असा संशय आहे. ज्या दिवशी आत्महत्या केली त्यावेळी विशालचे वडील आणि काका आतमध्ये गेले होते. ती परिस्थिती पाहून त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केलं किंवा त्याला जेल प्रशासनानं मारलं असा संशय आहे. या प्रकरणात आम्ही याचिका दाखल करणार आहोत, असं विशालचे वकील संजय धनके यांनी सांगितलं.

काय होते प्रकरण?

२३ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी कल्याण पूर्वेतून अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले होते. आईकडून २० रुपये घेऊन अल्पवयीन मुलगी खाऊ आणण्यासाठी दुकानात गेली होती. अल्पवयीन मुलगी परत न आल्याने कुटुंबाने मुलीचा शोध सुरू केला. मुलीच्या वडिलांनी मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार कोळसेवाडी पोलीस ठाण्यात केली.

२४ डिसेंबर रोजी मुलीच्या मृतदेह कल्याणजीक बापगाव परिसरात सापडला. मुलीच्या मृतदेह शवविच्छेदनासाठी जे जे हॉस्पिटलला पाठवण्यात आला.शवविच्छेदन अहवालात निष्पन्न झाले की मुलीवर



लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. पोलिसांच्या तपासात मुख्य आरोपी विशाल गवळी आणि त्याच्या पत्नीचेही नाव समोर आले.

विशाल गवळी याच्या पत्नीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले. पत्नीने दिलेल्या माहितीनुसार, मुलीला सायंकाळी पाच वाजता घरात घेतले. त्यावेळी विशाल गवळीने मुलीसोबत गैरकृत्य करून हत्या केली. त्यानंतर एका मोठ्या बॅगमध्ये मुलीचा मृतदेह टाकून ठेवला होता. आरोपीची पत्नी बँकेत नोकरी करत असल्याने संध्याकाळी ७ वाजता घरी आली. ७ वाजता दोघे पती-पत्नी एकत्र बसून मृतदेहाचे काय करायचे याबद्दल योजना आखली.

त्यापूर्वी घरातील रक्त दोघांनी पुसून टाकले. रात्री ८.३० वाजता मित्राची रिक्षा विशालने बोलावून घेतली. ९ वाजता बापगावच्या दिशेने रवाना झाले. तिथे मृतदेह फेकून दोघे घरी परतले. घरी परतत असताना विशालने आधारवाडी चौकातून दारू विकत घेतली आणि तेथून आपल्या पत्नीच्या गावी बुलढाणा येथे निघून गेला. पत्नी साक्षी मात्र येथेच राहिली. मात्र घराजवळ सापडलेल्या रक्तामुळे विशाल याने हे कृत्य केल्याचा संशय आला.

पोलिसांनी साक्षीला ताब्यात घेत चौकशी केली आणि तिने घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी विशालला पत्नीच्या गावातून शेगाव येथून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले.

# राज्यातील बालिका आणि बालक आश्रमांचा सर्व्हे करून अवैध आश्रमांवर कठोर कारवाई करा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १६, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील खडवली येथील लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणाची विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तात्काळ दखल घेतली आहे. त्यांनी आज स्वतः उल्हासनगर येथील ठाणे जिल्हा महिला व बाल विकास विभागाला भेट दिली आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली.

या प्रकरणातील पीडित २० मुली आणि ९ मुले यांची त्यांनी शासकीय निरीक्षणगृहात जाऊन प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. याप्रकरणी भा.न्या. संहिता २०२३ चे कलम ६रू(१), ६५(२), ७रू, ११९(२), ३(५), बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधि.२०१२ चे कलम ४,६,८, सह अल्पवयीन न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधि. २०१५ चे कलम ४२,७५,८२(१) प्रमाणे पाच आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या वेळी डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. याप्रकरणी शासनाची भूमिका अत्यंत गंभीर असून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी सक्षम सरकारी वकील नेमले जातील.



डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणातील पीडित मुलींच्या पुढील शिक्षणाची आणि पुनर्वसनाची जबाबदारीही लक्षात घेतली असून, मुलांचे शिक्षण खंडित होता कामा नये. त्यांना सुरक्षित आणि निर्भय वातावरण मिळावे. मुली व मुलांना कुठे राहायचे आहे, याबाबत बाल न्यायालय निर्णय घेईल, असे त्या म्हणाल्या.

तसेच, जिल्हा परिषद किंवा महानगरपालिकेच्या शाळांमध्ये एकच पत्ता असलेली मुले आढळल्यास, त्या ठिकाणी अवैध बालिका आश्रम आहेत का, हे तपासून पाहण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पसायदान संस्थेत जिथे पीडित मुलं राहत होते तिथे प्रत्येक मुलाचा पत्ता 'रेल्वे स्टेशन' असा नमूद आहे, हे अत्यंत संशयास्पद आहे. ही मुले खरंच स्टेशनवर राहत होती का? की संस्थाचालकांनी मुद्दाम चुकीची माहिती दिली आहे? असा सवाल करत त्यांनी पोलिसांना या सगळ्या बाबींची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**महानगरपालिका आणि महिला विभागांशी समन्वय...**

या मुद्द्यांवर उल्हासनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्रीमती मनीषा आव्हाळे, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. स्वामी, महिला व बालविकास विभागाच्या सुवर्णा पवार, अधिकारी संतोष भोसले, तसेच समुपदेशकांशी संवाद साधून त्यांनी माहिती घेतली. याच दरम्यान, उल्हासनगरमधील इतर बालिकाश्रमांची चौकशी करण्याची विनंतीही त्यांनी आयुक्तांना केली आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने उल्हासनगर शहरातील इतर सामाजिक प्रश्नांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करून येत्या महिन्यात आढावा बैठक घेणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

**मुलींच्या सशक्तीकरणासाठी पुढाकार...**

महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, या मुलींच्या मार्गदर्शनासाठी ऑनलाइन बैठकांचे आयोजन करा, त्यांच्याशी सतत संपर्कात रहा. बालिका आश्रमातून वातावरणामुळे काही वेळेस मुली पळून जातात त्यांना मानसिक सशक्तिकरणाची गरज असते. त्यामुळे त्यांच्यासाठी मन रमेल असे सांस्कृतिक व सृजनशील कार्यक्रम आयोजित करा.

त्यांनी हेही सुचवले की, समुपदेशक यांनी मुलांमुलींनी सांगितलेली घटना डायरीत लिहून त्याची प्रत उथउ, पोलीस व महिला बालविकास विभागाकडे सादर करावी. दोष सिद्धीचे प्रमाण वाढावे यासाठी बी-समरी रिपोर्ट्सची तपासणी व सक्षम वकिलांची नेमणूक गरजेची आहे. सीसीटीव्ही मॉनिटरिंग योग्य पद्धतीने केल्यास असे प्रकार टाळता येतील, असेही त्या म्हणाल्या.

या प्रकरणात प्रशासनाने तत्पर कारवाई केल्यामुळे विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोरे यांनी प्रशासनाची प्रशंसा केली.

## थोडक्यात

### आरटीई प्रवेश प्रक्रिया प्रतिक्षा यादी टप्पा क्र.२ साठी प्रवेश मुदतीत वाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, ठाणे :** आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेनुसार २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी निवड झालेल्या प्रतिक्षा यादी टप्पा क्रमांक २ मधील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम मुदत आता २१ एप्रिल २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

याआधी ही अंतिम तारीख १५ एप्रिल २०२५ निश्चित करण्यात आली होती. मात्र काही पालकांनी अद्याप प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्यामुळे ही मुदत एक आठवड्याने वाढवण्यात आली आहे.

प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी अलॉटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून प्रवेश निश्चित करून घ्यावा. ही मुदतवाढ ही अंतिम आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान देण्याची मागणी



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१६, उदगीर (लातूर) :** जळकोट भाजप प्रणित सरकारने सत्तेत बसण्यासाठी वचनामा जाहीर केला होता. त्या जाहीरनामाची सरसकट अंमलबजावणी करण्यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते. व लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान देण्याची जाहीर केले होते. शेतातील व घरगुती वीज बिल माफ करावे, शेतकऱ्यांनी बँकेचे घेतलेले कर्ज माफ करण्याऐवजी बँकेने कर्जधारक शेतकऱ्यांना त्रास देण्याची काम चालू आहे. आज शेतकऱ्यांच्या शेतमालाला कुठल्याही प्रकारचा हमीभाव दिला जात नाही. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. तरी सरसकट शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, त्याबद्दल कर्ज वसुली सक्तीची करण्यात येत असून ती करण्यात येऊ नयेत. सततच्या कर्ज वसुलीमुळे शेतकऱ्यांना मागे आड, तिकडे विहीर अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जापोटी आत्महत्या चा मार्ग अवलंबित असून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये म्हणून तात्काळ कर्ज वसुली थांबण्यात यावी व कर्जमाफी देण्यात यावी. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यात यावे. शेतीतील व घरगुती वीज बिल माफ करण्यात यावे. घरकुल यांच्या लाभार्थ्यांना वाळू मोफत वाटप करण्यात यावी. घरकुलाच्या अनुदान त्वरित देण्यात यावे, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयात शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या उपस्थित जळकोट तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनानुसार मागणी मान्य नाही झाल्या तर तहसील कार्यालय जळकोट समोर समोर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्यात येईल असे निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख विकास गोविंदराव सोमुसे-पाटील अतनूरकर, , , शंकर धोंडापुरे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सत्यभामा कदम, शहर प्रमुख नितीन धूळशेटे, सोपा शंकर सावकार, सारंग आगलावे, प्रियंका बोळेगावे, विकास कापसे, सुभाष गुंडिले, नितीन भाऊ शेट्टी, शंकर सोपा, विश्वनाथ महाराज, बाळू पाटील, लड्डू संगेवार, हिंगणे गुरुनाथ, राम जडीतकर, बाबू कदम, माधव सोमसे, कापडे, गोविंद बारसुळे, कापसे नवनाथ, गोळेगाव शंकर, भोळे गाव कदम, सत्यभामा कदम, भीमराव ढवळे, शंकर धोंडापुरे, संगेवार प्रमोद, सारंग आगलावे, वेंकट शिनगारे, नारायण कळसे, बसवराज नाईकवाडे, सुरेंद्र साळुंखे, शिवचंद्र थोटे, सदानंद पांचा ळ, शिवशेट्टी बालाजी, गजानन बादुर्ग, अशोक पांचाळ, संभाजी थोटे, ज्ञानोबा रावन गुप्ते यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

## संपादकीय



## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक ( १०५ ) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृशच परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखायला हवे !



आजकाल बहुतांश विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन स्वतः च्या जीवनाचे वाटोळे करून घेत आहेत. त्यांना आईवडील शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. त्यांना शिक्षणासाठी वेळोवेळी पैसा पुरवतात. पण आमचे विद्यार्थी आईवडिलांनी शिक्षणासाठी पाठवलेला पैसा शिक्षणावर न लावता ढाब्यावर जाऊन पार्टी खाण्यात किंवा चंगळवादी जीवन जगण्यासाठी उपयोगी आणतात. काहीजण तर तो पैसा शिक्षणासाठी न लावता आपल्या व्यसनी गरजा पूर्ण करण्यासाठी कारणी लावतात. स्वतः चा किंवा मित्र-मैत्रिणींचा वाढदिवस साजरा करणे, कॉफीशॉपला जाऊन मैत्रीणी बरोबर एन्जॉय करणे , आपल्या प्रेयसीला किंवा प्रियकराला नवेकोरे कपडे वा इतर भेटवस्तू घेऊन देणे, यासाठी वारेमाप खर्च करणारे आमचे बहुतांश विद्यार्थी आईवडिलांची शिक्षणाच्या नावाखाली फसवणूक करत आहेत. आई-वडिलांचे रक्त पीत आहेत. त्यांना काय माहित? की, आपण पाठवलेल्या पैशांचे आपली मुले काय करतात? कारण ते बिचारे आईवडील गावाकडे राहून आपल्या मुलांना शिक्षणासाठी जीवाचे रान करून व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून शिक्षणासाठी पैशे पाठवतात. प्रसंगी तेही जमत नसेल तर शेत गहाण ठेवतात. पण आपल्या मुलांना शिक्षणासाठी पैशाची कमतरता भासू देत नाहीत. त्यांनाही वाटते की, आपला मुलगा खूप खूप शिकेल आणि एकदिवस आमच्या कष्टांचे चीज करून आमचा, शाळेचा व गावाचा मान वाढवेल. या अपेक्षेने बहुतांश आईवडील आपल्या मुलांना शिक्षणासाठी जराही पैसा कमी पडू देत नाहीत. कारण ते बिचारे आईवडील अहोरात्र शेतात घाम गाळून कष्ट करण्यात मश्गूल असतात. त्यांनाही वाटते की, आपला मुलगा खूप खूप शिकत आहे. म्हणून नामांकित क्लासेसला सुध्दा भरमसाठ पैसा भरतात. तसेच त्यांना कॉलेजला व क्लासेसला जायला भारी किंमतीची गाडी घेऊन देतात.म्हणजे त्यांचे सर्व हट्ट आईवडील पुरवतात. कारण त्यांना असे वाटते की, आपला मुलगा एकदिवस आमच्या कष्टांचे चीज करून आमचे व गावकऱ्यांचे स्वप्न साकार करेल व आम्हाला सुखाचे व आनंदाचे दिवस दाखवले. या अपेक्षेने बहुतांश आईवडील जगत राहतात. पण विद्यार्थी आपल्या आईवडिलांच्या कष्टांची जाणीव न ठेवता आईवडिलांनी पाठवलेला पैसा शिक्षणासाठी न लावता चंगळवादी जीवन जगण्यासाठी खर्च करतात. व्यसनी गरजा पूर्ण करण्यासाठी दारू व गुटख्यावर उधळत असतात. त्यांना अजूनही आईवडिलांच्या कष्टांचे व शिक्षणाचे महत्त्व कळालेले नाही. म्हणजे ते अजूनही अविचारी व अविवेकी आहेत. असेच म्हणावे लागेल. मग त्यांना शिक्षणाचे महत्त्व कोण सांगणार? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि हा प्रश्न आईवडिलांनी व शाळेतील शिक्षकांनीच सोडवायला हवा.

त्यासाठी प्रत्येक आई-वडिलांनी व शिक्षकांनी आपल्या मुलांना व विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायला हवे. महापुरुषांची व थोर विचारवंतांची जीवनचरित्रे व आत्मचरित्रे वाचायला द्यावीत. आणि शिक्षकांनीही शालेय जीवनात विद्यार्थ्यांना संस्काराबरोबरच शिक्षणाचे महत्त्व वेळोवळी पटवून द्यायला हवे. थोडेफार महामानवांचे विचार व त्यांचा शैक्षणिक संघर्ष सांगावा. म्हणजे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटकन कळेल. आणि विद्यार्थीही जोमाने अभ्यासाला लागतील. शालेय जीवनात विद्यार्थ्यांवर झालेले संस्कार चिरकाळ टिकणारे असतात. आणि विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणतात. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देतात. आणि मग पुढील उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी तन-मन-धनाने प्रेरीत होऊन अभ्यास करतात. आणि यशोशिखरावर विराजमान होतात. पण खेदाची बाब अशी की, आजकालचे बहुतांश विद्यार्थी शिक्षणापासून लांब लांब जात आहेत. काही विद्यार्थी तर पूर्णपणे मोबाईलमध्येच गुरफटून गेलेले दिसत आहेत. मोबाईलवर तासनतास व्यस्त राहत आहेत. शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडत आहेत. व्यसनाच्या आहारी जाऊन व्यसनात आकंठ बुडत आहेत. मग या नादात आमचे विद्यार्थी कशाला अभ्यास करतील? आणि त्यांना शिक्षणाचाचे महत्त्व कसे काय कळणार?

त्यासाठी प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलांना अगोदर सुसंस्कारी बनवून शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे. कारण बालवयात विद्यार्थ्यांवर झालेले संस्कार व ज्ञान कायमस्वरूपी टिकणारे असते. म्हणून विद्यार्थ्यांना घडविण्यात सिंहाचा वाटा, जास्त करून, आई-वडिलांचा व शालेय शिक्षकांचा असतो. पण आजकालचे बहुतांश शिक्षकच व्यसनी, राजकारणी व कामचुकार झाले आहेत. त्यांना विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काहीही देणेघेणे राहिलेले नाही. ते फक्त आपला अभ्यासक्रम लवकरात लवकर कसा संपेल? हे बघतात. अशा व्यसनी व कामचुकार शिक्षकांमुळेच शैक्षणिक क्षेत्राचे व बहुतांश विद्यार्थ्यांचे वाटोळे होत आहे. विद्यार्थी वाम मार्गाला जाऊन शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर फेकले जात आहेत. अशा व्यसनी शिक्षकांच्या व्यसनाला आळा घातलाच पाहिजे. व त्यांना कडक शिक्षा झालीच पाहिजे. तरच शिक्षण क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होईल. शिक्षकांशा कठोर शिक्षा देऊन वठणीवर आणल्यास शिक्षक सुध्दा विद्यार्थ्यांना तळमळीने शिकवतील. आणि विद्यार्थीही मन लावून अभ्यास करतील.आणि या देशाचे शीलवान, गुणवान व आदर्श नागरिक तयार होतील... फक्त गरज आहे ती, विद्यार्थ्यांनी वेळीच शिक्षणाचे महत्त्व ओळखून अभ्यासाला सुरुवात करण्याची... महापुरुषांची व थोर विचारवंतांची पुस्तके वाचण्याची तसेच आपले आदर्श छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे विचार आत्मसात करून स्वतःची वैचारिक पातळी भक्कम करण्याची....चला तर मग विद्यार्थ्यांनो शिक्षणाचे महत्त्व ओळखून लागूया अभ्यासाच्या तयारीला....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## करंजी घाटात २० हजार लिटर क्षमतेचा पेट्रोलचा टँकर पलटी...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पाथर्डी (अहिल्यानगर) :** वीस हजार लिटर पेट्रोल घेऊन जाणार्या टँकरचे ब्रेक फेल झाल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून टँकर पलटी झाल्याची घटना कल्याण-निर्मळ महामार्गावर काल मंगळवारी (दि.१५) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास करंजी घाटात घडली. तीव्र तापमान असताना पलटी झालेल्या टँकरमधून इंधनाची गळती सुरू झाल्याने एकच खळबळ उडाली. टँकर चालक गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी नगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह अग्निशमन गाडी घटनास्थळी दाखल झाली. पेट्रोलचा टँकर बाजूला घेतल्यानंतर इंधन गळती थांबवली. रस्त्यावर पाणी मारून रस्ता वाहन चालकांसाठी खुला करण्यात आला. मुंबईकडून परभणीला वीस हजार लिटर पेट्रोल घेऊन जाणारा टँकर माणिकशहा पीरबाबा दर्गाजवळ धोकादायक वळणावर उलटला.



रस्त्यावर पलटी झालेल्या टँकरमधून पेट्रोल गळती सुरू झाली होती. अगोदरच कडक उन्हामुळे तापमानात मोठी वाढ झाली आहे तर दुसरीकडे टँकरमधून पेट्रोलची गळती होत होती. पेट्रोल अत्यंत ज्वलनशील असल्यामुळे आग लागण्याची शक्यता होती त्यामुळे येणारी-जाणारी वाहतूक थांबविण्यात आली होती. दोन तास घाटातील वाहतूक ठप्प झाली होती. प्रवाशांनी टँकरमधील गळती होत असलेले पेट्रोल पाण्याच्या मोकळ्या बाटल्या, दुधाचे कॅन, प्लास्टिकचे ड्रममध्ये भरून नेण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी त्यांना रोखले. पोलीस उपनिरीक्षक हरिश भोये, हरिभाऊ दळवी, भगवान टकले यांच्यासह राज्य मार्ग पोलीस विभागाचे पीएसआय राठोड, सहाय्यक फौजदार काळे, हेडकॉन्स्टेबल देविदास खेडकर, भडांगे, दरे, टेकाळे यांनी अपघातग्रस्त टँकर बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत केली. करंजी येथील शिवा मोरे, शिशीर ओहळ, सचिन शिदोरे, पांडू पवार, शुभम मुटकुळे, किरण अकोलकर, अभि अकोलकर, सुरज अकोलकर, सागर कराळे, महादेव शिंदे, कानिफनाथ शिंदे,आमोल शिंदे यांनी प्रशासनाला मदत केली.

## वचक..

आतां ऋग्णालयांला
हवायं जबरी वचक
दाखल करता ऋग्ण
अटी नियम जाचक

अन्यायाच्याकहाण्या
कानांवर येती रोचक
द्यायलाहवी यंत्रणेला
वेळीचं औषधी रेचक

करा कारवाई सांगती
विचीत्र घटना सूचक
बसवा सत्वर अंकुश
परिक्षण समय सूचक

कडकनिरीक्षण करुन
डोसपाजायचा पाचक
कोरडे दगडांचे सेवक
नोकरी करी आरोचक

विटाळे पवित्र वास्तूस
घुसले काहीसे किचक
साधन बनले कमाईचे
साधे ईलाजही खर्चक

देवदूता समान डॉक्टर
मानतो धन्वंतरीअर्चक
वाटे निदान हा तरी हो
व्यवसाय शुध्दअवंचक

विश्वासाचे नाते इथले
विभाग असती शौचक
बदनाम ना हो सर्वांची
बसलायं विचीत्रलचक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... अचूक बातमी

## आचारधर्म – जीवनाचं खरे मार्गदर्शन




महाभारतात कुरुक्षेत्रावरील युद्धानंतर शोकमग्न युधिष्ठिराला शरशय्येवर पडलेल्या पितामह भीष्मांनी प्रदीर्घ उपदेश दिला आहे. हा उपदेश महाभारताच्या शांतीपर्वात येतो. पितामह भीष्म म्हणतात, युधिष्ठिरा, आचार हेच धर्माचे अधिष्ठान आहे. तू आचारांचा अवलंब केलास तरच तुला धर्माचे ज्ञान होईल.

भीष्म पुढे असेही सांगतात की, संकट कोसळले असता असत्य भाषण करणारा सत्यवादी ठरतो. म्हणजेच, अधर्माने वागणारा माणूस काही वेळा धर्माचरण करणारा ठरतो. आणखी पुढे भीष्म सांगतात, आपल्या बाबतीत जी गोष्ट दुसऱ्यांनी करू नये असे वाटते, ती गोष्ट आपणही दुसऱ्यांच्या बाबतीत करू नये. या उपदेशातील तीन गोष्टी वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात माणसाने कटाक्षाने अंगी बाणवायला हव्यात.

आचार हाच धर्म आहे किंवा आचार म्हणजे कृतिशील राहणे – हेच सर्व धर्माचे अधिष्ठान आहे. माणसाने स्वतःला कशात तरी गुंतवले पाहिजे. कोणत्यातरी ध्येयाने झपाटून गेलं पाहिजे. विचारात स्पष्टता आणून मनातील गोंधळ दूर केला पाहिजे. धार्मिकता म्हणजे फक्त पूजापाठ किंवा धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेणे नव्हे, तर आपले दैनंदिन वर्तन, नैतिक निर्णय, इतरांबद्दल असलेला आदर व प्रेम – हेच धर्माचे मूळ तत्त्व आहे. आचार आणि नैतिक मूल्ये हाच खरा धर्म आहे.

पुत्र म्हणून आई-वडिलांप्रती आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. पुढे पिता, पती, पत्नी किंवा इतर सर्व नातेसंबंधांमध्ये आपली जबाबदारी ओळखून ती आदर्शपणे पार पाडली पाहिजे. समाज व देशासाठी जबाबदारी पार पाडताना उत्तरदायित्वाची भावना मनात असली पाहिजे.

संकटात माणसाने कधी कधी टोकाची सत्यवक्ता भूमिका न घेता वास्तववादी, बचावात्मक भूमिका घ्यावी. संकटात स्वतःचे किंवा इतरांचे प्राण वाचवण्यासाठी कधी कधी मूल्यांना मुरड घालावी लागते. उदाहरणार्थ, एखाद्याच्या पत्नीचे ऑपरेशन होणार असून त्याच्याकडे पुरेसे पैसे नसतील, तर त्याने आपल्या स्वाभिमानाला थोडीशी मुरड घालून नातेवाईकांकडून किंवा मित्रांकडून मदतीची विनंती करावी. अशा प्रसंगी ही विनवणी लाचारी वाटत असली, तरी ती धर्माचरणच असते. जर तो आपल्या आदर्शांना चिकटून राहिला, तर कदाचित त्याची पत्नी आपला जीव गमावेल.

आपण इतरांकडून अनेक अपेक्षा बाळगतो. जसे की – कोणी आपला अपमान करू नये, फसवणूक करू नये, मदत टाळू नये, दिलेला शब्द पाळावा. हेच नियम आपण स्वतः इतरांप्रती लागू करत नाही. पितामह भीष्म यावर एक सोपा नैतिक नियम सांगतात – जे वागणं आपल्याला इतरांकडून नकोसं वाटतं, तेच आपण इतरांशी करत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या मित्राची टिंगल करून आपण त्याला नकळत अपमानित करतो, पण जर कुणी आपल्याबाबत तसंच वागलं तर ते सहन होत नाही. दुसऱ्याची टिंगल करण्याआधी, स्वतःची टिंगल सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे.' Give respect, take respect, या वाक्याप्रमाणे आपण इतरांचा मानसन्मान राखल्यास, आपल्यालाही तो मिळतो.

जीवनातील अनेक टप्प्यांवर अशा छोट्या गोष्टी लक्षात ठेवल्यास, आपण आदर्श जीवन नक्कीच जगू शकतो.

भीष्म पितामहांनी दिलेला उपदेश हा फक्त प्राचीन काळापुरता मर्यादित नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनातही हा उपदेश आपल्याला जीवनात योग्य दिशा दाखवतो. आचार, नैतिकता, परिस्थितीनुरूप विचार, आणि परस्पर सन्मान हीच खऱ्या अर्थाने धर्माची व्याख्या आहे. हा आचारधर्म आपण आपल्या जीवनात पाळला, तर समाज अधिक सुजाण, सुसंस्कृत आणि न्यायप्रिय बनेल.

जीवन हे संकटांनी भरलेलं असतं. पण संकटांवर मात करताना आपली मूल्यं, कर्तव्यं आणि नैतिकता यांची समज ठेवूनच आपलं जीवन अर्थपूर्ण बनवलं पाहिजे. भीष्मांचा उपदेश हे जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर लागू होणारे अमूल्य मार्गदर्शन आहे. म्हणूनच, आचारधर्म हेच आपलं खऱ्या अर्थाने जीवनमार्गदर्शक असायला हवं.



**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# जिल्हा क्रीडा संकुलाची २५ एकर जमीन त्वरित हस्तांतरित करावी

## नांदेड ऑलिंपिक संघटनेची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, नांदेड :** महाराष्ट्र भरात सर्वात जास्त तालुके असलेला नांदेड जिल्हा आहे. नांदेड शहरात हक्काचे एकही मैदान उपलब्ध नाही. त्यामुळे खेळाडू विविध खेळापासून वंचित आहेत. त्याकरिता २५ एकर जागा जिल्हा क्रीडा संकुलासाठी देण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई स्तरावर प्रलंबित आहे. तो प्रस्ताव त्वरित मार्गी लावून ती २५ एकर जमीन त्वरित जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे हस्तांतरित करावी. अन्यथा २५ एप्रिल पासून नांदेड ऑलिम्पिक असोसिएशन व एक विद क्रीडा संघटनाच्या माध्यम ातून उपोषण करण्याचा इशारा संघटना सचिव बालाजी पाटील जोगदंड व कोषाध्यक्ष प्राध्यापक जयपाल रेड्डी, बंटी सोनसळे, गोविंद पांचाळ यांनी दिला आहे.

मराठवाड्यात संभाजीनगर नंतर सर्वच खेळामध्ये नांदेड चा नंबर लागतो. त्यामुळे तात्कालीन माजी मुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री, तात्कालीन पालकमंत्री माननीय अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी मौजे असर्जन (कौठा) येथील गट क्रमांक १११, ११२, ११३, ११४, ११५ संदर्भातील जमीन फेर मोजणी करून २५ एकर जागेचा प्रस्ताव मंजुरीसाठी मंत्रालयात पाठवला होता. सदर प्रस्ताव मा अतिरिक्त मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई येथे मागील ३-४ वर्षापासून प्रलंबित आहे. सदरचा प्रस्ताव तात्काळ निकाली काढून २५ एकर ची जिल्हा क्रीडा संकुलाची जागा जिल्हा क्रीडा संकुल समिती नांदेडला हस्तांतरित करावी. अशी मागणी नांदेड ऑलिंपिक असोसिएशनच्या वतीने व जिल्ह्यातील सर्व एक विविध क्रीडा संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, खासदार म ाजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, क्रीडामंत्री दत्ता भरणे, बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह पालकमंत्री नांदेड अतुलजी सावे, खासदार अजितजी गोपछडे, खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण नांदेड लोकसभा तसेच मंत्रालयीन स्तरावर संबधीत सर्व अधिकारी यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.सदर निवेदनावर नांदेड ऑलम्पिक संघटना सचिव बालाजी पाटील जोगदंड ,कोषाध्यक्ष जयपाल रेड्डी, प्रलोभ कुलकर्णी (ॲथलेटीक), राहुल वाघमारे (तलवारबाजी), जनार्दन गोपिले (रस्सीखेच), रमण बैनवाड (योगा), डॉ.दिनकर हंबर्डे (बुद्धिबळ), रमेश नांदेडकर(खो खो), विनोद गोस्वामी (बास्केटबॉल), राजेश जांभळे (वुशू), वृषाली पाटील जोगदंड (धनुर्विद्या),जस्विंदर सिंगरामगडिया (वेट लिफ्टिंग), ज्ञानेश्वर सोनसळे (सायकलिंग), राष्ट्रपाल नरवाडे (कुराश), अजगर आली पटेल (कबड्डी) +आट्यापाट्या), जयपाल रेड्डी (जिम्नास्टिक) (ट्रायथॉलॉन), विष्णु पूर्णे (कॅडबॉल), मधुकर शिरसागर (पावरलिफ्टिंग), इमरान खान (स्केटिंग), कुलदीप सिंग जाट (मलखांब), मनोज जोशी(हॅंडबॉल), बालाजी सिनेवाड (टेनिकोईट), बालाजी जोगदंड (तायक्कांदो), डॉ.दिलीप भडके, नवनाथ पोटफोडे, मधुकर कांबळे यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# पारनेरमध्ये आमदार दाते यांच्या नेतृत्वात जनता दरबाराचे यशस्वी आयोजन

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.१६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर शहरातील इंदिरा भवन येथे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. या जनता दरबाराला शेकडो नागरिकांनी आपल्या विविध सम स्या घेऊन हजेरी लावली. नागरिकांच्या प्रश्नांना ऐकून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्याचे आश्वासन आमदार दाते यांनी दिले. दरमहा एक दिवस जनता दरबाराचे आयोजन करून नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. या जनता दरबारात नागरिकांनी महसूल विभाग, पुरवठा विभाग, भूजम ापन विभाग, पंचायत समिती अंतर्गत विविध विभागांशी संबंधित तक्रारी मांडल्या. यावेळी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तक्रारींची दखल घेऊन अनेक प्रश्न तात्काळ मार्गी लावले. तहसीलदार गायत्री सौंदाणे, पंचायत समि तीचे गटविकास अधिकारी दयानंद पवार, पारनेर पोलीस निरीक्षक समीर बावरकर, सुपा पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या सम स्यांचे निराकरण करण्यासाठी तत्परता दाखवली.जनता दरबारात महायुतीच्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

यावेळी चालू ठेवण्यासाठी भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटिल शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, ज्येष्ठ नेते वसंत चेडे, जिल्हा बँक संचालक प्रशांत दादा गायकवाड, राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, युवक अध्यक्षा अपर्णा खाम कर, संदीप कपाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या सम स्या जाणून घेतल्या आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याचे काम केले.आमदार काशिनाथ दाते यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांवर झालेला अन्याय दूर करण्याचा निर्धार व्यक्त केला. नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून निराकरण करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

प्रत्येक महिन्याला जनता दरबार आयोजित करून आम्ही जनतेच्या जवळ राहू, असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी विश्वास निर्माण झाला असून, अनेकांनी आमदार दाते यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. हा जनता दरबार यशस्वी ठरला असून, येत्या काळातही अशा उपक्रमांद्वारे नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार दाते आणि महायुतीचे कार्यकर्ते कटिबद्ध असल्याचे दिसून आले. या दरबारामुळे पारनेर तालुक्यातील नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.




नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने निराकरण करणे हा जनता दरबाराचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक महिन्याला असा दरबार आयोजित करून आम्ही जनतेच्या जवळ राहू आणि त्यांच्यावर झालेला कोणताही अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न करू. आज शेकडो नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या, त्यापैकी अनेक प्रश्न मार्गी लावले असून, उर्वरित समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधला जाईल.

**- काशिनाथ दाते (आमदार)**

# कळंब तालुक्यातील ९२ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## आता सरपंचाची निवड होणार थेट जनतेतून

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१६, कळंब (नांदेड) :** कळंब तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम बुधवार, दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी पंचायत समिती सभागृहात उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम झाला.

यावेळी तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार सांगळे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीनिवास शिंदे, निवडणूक कर्मचारी पाचभाई आप्पा, गपाट, खलील यांच्यासह तालुक्यातील सरपंच, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आरक्षण सोडतीच्या चिठ्या लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आल्या.




--- गावनिहाय आरक्षण ----

अनुसूचित जातीसाठी –

पिंप्री (शि, डिकसळ, जायफळ, वडगाव (शि), भाटशिरपुरा, सापनाई, सातेफळ, गौर, वाकडी के. तर अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिलेसाठी शिंगोली, पाथर्डी, देवळाली, कन्हेरवाडी, जवळा खुर्द, आवाड शिरपूरा, कोथळा, मंगरूळ, बाभळगाव

अनुसूचित जमातीसाठी –

नागूलगाव

अनुसूचित जमातीच्या महिला –

घारगाव

सर्वसाधारण महिला –

रांजणी, पाडोळी, चोराखळी, उपळाई, हावरगाव, दाभा, खोंदला, गंभिरवाडी, बांगरवाडी, कोठाळवाडी, बोरवंटी, लासरा, वाणेवाडी, उमरा/परतापूर, गोविंदपूर, गौरगाव, खामसवाडी, लोहटा पूर्व, मस्सा ख, तांदुळवाडी, पिंपळगाव को, खेर्डा, अंदोरा, बारातेवाडी

सर्वसाधारण प्रवर्गासाठी –

ईटकुर, ढोराळा, एकुरका, ताडगाव, पिंपळगाव डोळा, आढाळा, सात्रा, भोगजी, रायगाव्हन, बहुला, आथर्डी, बरमाचीवाडी, वाकडी ई., बोरगाव ध., हिंगणगाव, करंजकल्ला, लोहटा पश्चिम, मोहा, नागझरवाडी, शिराढोण, वाघोली, सौंदना आंबा

ओबीसी प्रवर्गासाठी –

वाठवडा, येरमाळा, शेलगाव दि, भोसा, आडसूळवाडी, दुधाळवाडी, हासेगाव शि, देवधानोरा, सौंदना ढोकी/एरंडगाव, हासेगाव केज, खडकी, दहिफळ

ओबीसी प्रवर्गातील महिलेसाठी –

नायगाव, मलकापूर/संचितपूर, हाळदगाव, शेलगाव ज, पानगाव, म ाळकरंजा, शेळका धानोरा, रत्नापूर, भाटसांगवी, वडगाव ज, बोरगाव बु, निपाणी, बोरगाव खुर्द,

# प्रवीण गेडाम यांना शिक्षणशास्त्र विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक च्या तेराव्या दीक्षांत समारंभात भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागाच्या भाषा शिक्षण समितीचे अध्यक्ष चमू कृष्ण शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ.हरेराम त्रिपाठी, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले व विद्यापीठाच्या इतर विभागाचे विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत प्रवीण गेडाम यांना विद्यावारीधी (पीएच.डी) पदवी प्रदान करण्यात आली.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या शिक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ.ऋषिकेश दलाई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण गेडाम यांनी विदर्भातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व पालक यांचा व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन या प्रती असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास या विषयावरील आपले संशोधन कार्य पूर्ण केले.

विश्वविद्यालयाने त्यांना शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत आचार्य (पीएच. डी.) पदवी प्रदान केली.

# थोडक्यात

## चंद्रपूर वन अकादमीचा इंग्लंड येथील विद्यापिठाशी सामंजस्य करार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, चंद्रपूर :** शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवून शैक्षणिक देवाण-घेवाण आणि आंतरराष्ट्रीय समज दृढ करण्यासाठी चंद्रपूर वन प्रशासन, विकास आणि व्यवस्थापन अकादमी, (वन अकादमी) आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड ब्रिस्टल यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अनुषंगाने युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड, ब्रिस्टल येथील इकोसिस्टम सर्व्हिसेसचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मार्क एव्हरार्ड यांनी १३ ते १५ एप्रिल दरम्यान चंद्रपूर वन अकादमीला भेट दिली. त्यांच्या या भेटीवेळी वाईल्ड लाईफ अँड वेटलँड फाऊंडेशन चे शिवाजी चव्हाण सोबत होते.

या भेटीचे समन्वयक म्हणून अकादमीतील प्राध्यापक एस. के. गवळी यांनी जबाबदारी पार पाडली. भेटी दरम्यान डॉ.मार्क एव्हरार्ड यांनी वन अकादमीचे संचालक एम. श्रीनिवास रेड्डी आणि अकादमीच्या प्राध्यापकांशी सविस्तर चर्चा केली. खालील क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्याचे मुद्दे निश्चित करण्यात आले.

**ऑनलाईन व्याख्यानांचे आदान-प्रदान :-** युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड, ब्रिस्टल येथील प्राध्यापकांकडून चंद्रपूर वन अकादमीतील प्रशिक्षणार्थ्यांना ऑनलाईन व्याख्याने दिली जातील. तसेच चंद्रपूर वन अकादमीचे प्राध्यापक ब्रिस्टल विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्याख्याने घेतील.

**आंतरराष्ट्रीय परिषदा आणि कार्यशाळा :-** चंद्रपूर वन अकादमीमध्ये युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड, ब्रिस्टलच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा व परिसंवाद आयोजित केले जातील.

**संयुक्त आपातकालीन अभ्यासक्रम :-** दोन्ही संस्थांच्या सहभागाने संयुक्तपणे अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम चंद्रपूर वन अकादमीमध्ये आयोजित करण्यात येतील.

**संशोधन सहकार्य :-** महाराष्ट्र राज्य वन विभागाच्या संदर्भात महत्वाच्या संशोधन क्षेत्रांची ओळख पटवून त्यामध्ये ब्रिस्टलच्या संशोधकाचे तांत्रिक व शैक्षणिक सहकार्य घेण्यात येतील.

**अभ्यासक्रम मान्यता :-** चंद्रपूर वन अकादमी मध्ये घेतल्या जाणाऱ्या निवडक अभ्याक्रमांना ब्रिस्टलकडून मान्यता मिळविण्याची शक्यता तपासण्यात येईल.

या करारामुळे चंद्रपूर वन अकादमीतील शैक्षणिक आणि संशोधनात्मक कार्यक्षम ता वाढीस लागेल आणि प्रक्षशिक्षणार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्ञान व अनुभव प्राप्त होण्यास मदत होईल, असे वन अकादमीचे संचालक एम. श्रीनिवास रेड्डी यांनी कळविले आहे.

## वॉर्डनचे तडका फडकी काढले फर्मान



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून वाहतूक नियंत्रण करण्यासाठी ७५ वाहतूक नियंत्रण वॉर्डन नियुक्ती ६ हजार मानधन अटी शर्तीवर करण्यात आली होती. परंतु हे सर्व वॉर्डन गेले कित्येक वर्षांपासून अंतर्गत बदल्या केल्या गेल्या नसल्याने व त्यांच्या वाढत्या तक्रारी ह्या सतत सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण वाहतूक विभागाकडे प्राप्त होत आहेत. तसेच एका वॉर्डन ने आर्थिक गैरव्यवहार केल्यामुळे सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण विभागाचे संजय साबळे यांनी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन सर्व वॉर्डन यांना शिस्त लागावी व त्यांनी वाहतूक नियमानाचे काम चांगल्या प्रकारे करावे म्हणून त्यांच्या तडका फडकी तात्पुरत्या तैनातीचे आदेश अंतर्गत वाहतूक शाखेमध्ये जारी केले आहे.

## वयोमर्यादेने प्रस्थापितांच्या राजकारणाला सुरुंग

### भाजपात युवकांना मिळणार संधी; खा.अशोक चव्हाणांच्या खेळीकडे लक्ष



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड (नांदेड) :** भारतीय जनता पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदासाठी आता वेग आला आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने नवीन तालुकाध्यक्षाची निवड लवकरच होण्याची शक्यता आहे. सध्या भाजपाच्या तालुका, शहर पदांच्या निवड प्रक्रियेने वेग घेतला आहे. या पदासाठी वयाची मर्यादा ठेवण्यात आली असल्याने नव्या उमेदीच्या युवकांना संधी मिळणार आहे. आ.श्रीजया चव्हाण यांच्या सोबत मतदारसंघात स्वच्छ व दमदार युवकांची फळी उभी करण्यासाठी खा.अशोक चव्हाणांच्या नव्या खेळीने तोऱ्यात असणाऱ्या सर्वच प्रस्थापितांच्या सक्रिय राजकारणाला सुरुंग लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मध्यंतरी भाजपने जो जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करेल त्यास संघटनेत वाव मिळेल, असा अघोषित नियम केला होता. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी टेन्ट टाकून ताई माई अक्का म्हणत पद पदरात पाडून घेण्यासाठी भाजपा सदस्य मोहीम राबविली. परंतु आता ऐनवेळी लादण्यात आलेल्या वयोमर्यादेच्या अटीमुळेकार्यकर्त्यांच्या सक्रिय राजकारणाला सुरुंग लागल्याची चर्चा भाजप कार्यकर्त्यात दिसून येत आहे. खा.अशोक चव्हाण यांचा भाजप प्रवेश निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागणार असल्याचीही चर्चा आहे. मतदार संघाचे नेतृत्व आ. श्रीजया चव्हाण करीत असल्याने सुशिक्षित व विश्वासातील नवीन तरुण युवकांना संघटनेत वाव मिळणार आहे यात दुमत नाही.

मुदखेड तालुक्याचे अध्यक्ष पदासाठी शांत, संयमी व विश्वासू दत्तू देशमुख वाडीकर यांचे नाव जवळजवळ निश्चित असल्याचे बोलले जात आहे. तर शहराध्यक्ष पदासाठी हाडाचा कार्यकर्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामसिंग चव्हाण यांचे नाव आघाडीवर आहे. तसेच भोकर बाजार समितीच्या निवडणुकीत जवळच्याच लोकांच्या दगा फटक्यामुळे पराभूत झालेले सचिन पाटील मगरे यांनी ही पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. एकंदर खा. चव्हाण यांची खेळी पाहता युवा आ. श्रीजया चव्हाण यांच्यासाठी भविष्यातील राजकीय मोट बांधण्यासाठी सुशिक्षित व संयमी तरुणांना संघटनेत घेऊन दूरचा पल्ला गाठायची तयारी दिसते आहे असेच म्हणावे लागेल.